कार्यालय

दूरध्वनी क्र. ०७१२-२५५६७७३
Email ID:
apccfhrmadmn@gmail.com

महाराष्ट्र शासन
वन विभाग
प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय
वनभवन, रामगिरी रोड, सिव्हिल लाईन्स, नागपूर ४४०००१

---

**ई-मेलव्दारे**

क्रमांक : कक्ष-१०(२)/एक/प्र.क्रं.४६/(२१-२२)/ ३५८ नागपूर ४४०००१, दिनांक: ०४/०१/२०२२

प्रति,
प्रधान सचिव (वने),
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई-३२

विषय:- स्व. स्वाती नानाजी ढुमणे, वनरक्षक, ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर यांना वनशहीद म्हणून घोषित करून त्यांच्या वारसाना रू. १ कोटी सानुग्रह अनुदान मंजूर करणेबाबत

संदर्भ:- १) या कार्यालयाचे पत्र क्र. कक्ष-१०(२)/एक/प्र.क्र.४६/(२१-२२)/२५७, दिनांक २२/११/२०२१

२) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), नागपूर यांचे कडील पत्र क्र. कक्ष-२२(४)/आस्था/प्र.क्र.२६/२४४९/२१-२२, दिनांक २३/१२/२०२१

स्व. स्वाती नानाजी ढुमणे, वनरक्षक ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर यांना वनशहीद म्हणून घोषित करून त्यांच्या वारसाना रू. १ कोटी सानुग्रह अनुदान मंजूर करणेबाबत शिफारशीसह प्रस्ताव प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), नागपूर यांनी त्यांचे कडील संदर्भित कार्यालयीन टिप्पणी दिनांक २३/१२/२०२१ अन्वये इकडील कार्यासनास पाठविले आहे (प्रत सहपत्रासह सहपत्रित). प्राप्त दस्तऐवजानुसार प्रस्तुत प्रकरणाची पार्श्वभूमी थोडक्यात खालीलप्रमाणे आहे.

१) स्वर्गीय स्वाती ढुमणे, वनरक्षक ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर या कोअर विभागांतर्गत कोलारा परीक्षेत्रात अखिल भारतीय व्याघ्र प्रगणना-२०२२ करिता कामे करीत असतांना दिनांक २०/११/२०२१ रोजी सकाळी ८.०० वाजताचे सुमारास कक्ष-९७ मध्ये त्यांचेवर वाघाने केलेल्या हल्ल्यात त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. त्यांचे मृत्यू पश्चात त्यांचे कुटुंबात बेरोजगार पती व ४ वर्षाची मुलगी आहे. स्वर्गीय स्वाती ढुमणे, वनरक्षक यांच्या वारस कुटुंबीयांना प्रचलित पध्दतीनुसार तात्काळ शासनामार्फत रू. १५.०० लक्ष रक्कम प्रदान करण्यात आलेली आहे व त्यांचे पती श्री संदीप सोनकांबळे यांना ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प संवर्धन प्रतिष्ठान मार्फत तात्पुरती नोकरी देण्यात आलेली आहे. तसेच विशेष अनुकंपा नोकरीकरिता प्रस्ताव मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) चंद्रपूर यांचेकडे सादर करण्यात आलेला आहे.

२) पोलिस विभागात नक्षलवादी कारवाईत मृत्यू पावलेल्या किंवा कायमचे अपंग आलेल्या किंवा जखमी झालेल्या पोलिस अधिकारी/कर्मचारी यांना नुकसान भरपाई देणेबाबत गृह विभाग शासन निर्णय क्र. पीडब्ल्युएफ-१००३/प्र.क्र.८/पोल-७, दिनांक १६/३/२०१५ अन्वये तरतूद केली आहे. त्याच प्रमाणे गृह विभाग शासन निर्णय क्र. पीडब्ल्युएफ-०२०९/प्र.क्र.१०७/पोल-७, दिनांक ६/२/२००९ अन्वये नक्षलविरोधी कारवाईत विरगती प्राप्त झालेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांचे वारसांच्या संयुक्त नावाने रू. २५.०० लक्ष सानुग्रह अनुदान मुदत ठेव म्हणून देण्याची तरतूद आहे. तसेच महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्र. टीआरएस-१०९८/प्र.क्र.१९०/फ-६, दिनांक २२/९/२००८ अन्वये शासनाने महाराष्ट्र राज्याचे वनधोरण जाहीर केलेले आहे. त्यातील मुद्दा क्र. ३.३.१३ मध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे.

*"वनसंरक्षणाचे कर्तव्य पार पाडताना कोणत्याही वन अधिकारी/कर्मचारी यांचा मृत्यू झाल्यास अथवा अपंग झाल्यास अशा बाधित वन अधिकारी/कर्मचारी यांना किंवा त्यांचे नातेवाईकांना पोलिस खात्यात चालू असलेल्या पध्दतीप्रमाणे नुकसान भरपाई व आर्थिक मदत दिली जाईल."*

३) वनसंरक्षणाचे कर्तव्य पार पाडताना कोणत्याही वन अधिकारी/कर्मचारी यांचा मृत्यू झाल्यास अथवा कायम अपंगत्व आल्यास अशा बाधित वन अधिकारी/कर्मचारी यांना किंवा त्यांचे नातेवाईकांना नुकसान भरपाई व आर्थिक मदत देणेबाबतचा प्रस्ताव या कार्यालयाचे पत्र दिनांक १८/५/२०२१ व स्मरणपत्र दिनांक ७/१०/२०२१, २२/११/२०२१, १/१२/२०२१ व दिनांक ३०/१२/२०२१ अन्वये शासनास सादर करण्यात आले आहे. त्यास शासनाची मान्यता प्रतिक्षाधीन आहे.

तरी कु. स्वाती ढुमणे, वनरक्षक या कर्तव्य बजावत असतांना त्यांचा वाघाच्या हल्ल्यात मृत्यू झाल्यामुळे त्यांना वन शहीद घोषित करून पोलिस विभागात नक्षलविरोधी कारवाईत वीरगती प्राप्त झालेल्या अधिकारी/कर्मचारी यांचे वारसाना देण्यात येत असलेले २५.०० लक्ष सानुग्रह अनुदान यात वाढ करून रू. १ कोटी सानुग्रह अनुदान त्यांचे कायदेशीर वरसास देण्याबाबतची शिफारस क्षेत्र संचालक, ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर, अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पूर्व, नागपूर तसेच प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), नागपूर यांनी केलेली आहे. त्यास हे कार्यालय सहमत असून प्रकरणी शासन स्तरावरून कार्यवाही होणेस विनंती आहे.

सहपत्रः- संदर्भ क्र. २ सहपत्रासह

(विकास गुप्ता)
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक
(प्रशासन दुय्यम संवर्ग)

प्रतिलिपी माहितीस्तवः- (ई-मेलव्दारे)

१) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर
२) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पूर्व, नागपूर
३) मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) चंद्रपूर
४) वनसंरक्षक तथा संचालक, ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर